I J R S S I S, Spl Issue (IV), March-2022 : 146-149 e-ISSN 2347 – 8268 & 2347-8209 (P)
A Double-Blind Peer Reviewed Journal OPEN ACCESS Original Article
Reg. No. : MH-NGP/0000167
INTERNATIONAL JOURNAL OF RESEARCHES IN SOCIAL SCIENCE AND INFORMATION STUDIES
© VMS RESEARCH FOUNDATIONwww.ijrssis.in

# ग्रामीण विकासात एकात्मिक बालविकास योजनेअंतर्गत अंगणवाडी सेवीकाची भूमिका

प्रा मनोहर रा. चौधरी[1] व डॉ राधेश्याम पि. चौधरी[2]

[1]आनंद निकेतन कॉलेज आनंदवन वरोरा

[2]शिवरामजी मोघे कला वाणिज्य व विज्ञान महाविदयालय पांढरकवडा

Corresponding Author : mchoudhri1965@gmail.com

Communicated :21.03.2022 | Revision : 27.03.2022 | Accepted :30.03.2022 | Published: 02.05.2022

**प्रस्तावना :**

भारताच्या लोकसंख्येत मुलाचे प्रमाण हे मोठे व महत्वाचे आहे . त्यामुळे देशातील मुलाच्या वाढीवर व विकासामर देशाचे वामाजिक व आर्थिक भवितव्य अवलंबून असते . त्यामुळे देशातील बालकाच्या पोषनविषयक बाबी व आरोग्याचा दर्जा याकडे सरकारने लक्ष देणे फार आवश्यक आहे . आज भारतात २६ कोटी मुलापैकी बहुसंख्ये मुले ही आर्थिक व सामाजिक दृष्टीने दारिद्र्यामध्ये राहत असून जीवन जगत आहे . त्यामुळे भारतातील बालकांची शारीरीक व मानसिक बाढ ही खुंटली आहे. त्यामुळे भारत सरकारने पाचव्या पंचवार्षिक योजनेत देशातील ग्रामीण भागातील ० ते ६ वर्षाखालील मुलांचा सर्वांगीण विकास करण्यासाठी २ आक्टोंबर १९८५ या वर्षीपासून एकात्मिक बाल विकास कार्यक्रम सुरू केला . भारतात एकात्मिक बाल विकास योजनेअंतर्गत अंगणवाडीची स्थापना करण्यात येते आज भारतात ७ लाख अंगणवाडया आहेत.

एकात्मिक बालविकास योजना म्हणजे कायः
शासन बालकांच्या विकासाकरिता विशीष्ट विकासाचे उद्देश समोर ठेऊन बालकांच्या विकासकरिता राबविण्यात येणारी योजना म्हणजे एकात्मिक बालविकास योजना होय.

भारतात १००० लोकवस्तीमागे १८ अंगणवाडी केंद्र आहे . अंगणवाडीचा मुख्य उद्देश हा ग्रामीण भागातील ० ते ६ वयोगटातील बालकांना सेवा व सुविधा पुरविणे आहे . तसेच १५ ते ४५ वयोगटातील महिलांना मार्गदर्शन करून त्या कहिलांना सेवा व सुविधा पुरविणे हे अंगणवाडीचे महत्वाचे कार्य आहे. या सेवा खालील प्रमाणे आहे.

१) बालकांना व महिलांना पूरक व पोषक आहार देणे.
२) गरोदर माताचे व बालकाचे लसीकरण करणे.
३) बालकाची व मातांची आरोग्य तपासणी करणे.
४) बालकांना औपचारिक अनऔपचारिक पूर्व प्राथमिक शिक्षण देणे.

**अंगणवाडी म्हणजे काय?**

अंगणवाडी म्हणजे ग्रामीण भागामध्ये अंगण परिसरात चालविली जाणारी माहिती केंद्र म्हणजे अंगणवाडी होय. अंगणवाडीमध्ये अंगणवाडी सेविका ही अंगणवाडीच्या कार्यकर्त्यांनी केलेल्या कार्याचे निरीक्षण व तपसणी करून अंगणवाडी कार्यकर्त्याल्या मार्गदर्शन करीत असते . तसेच ० ते ६ वयोगटातील मुलांना प्राथमिक पूर्व शिक्षन देणे व गरोदर मातांना मार्गदर्शन करणे ही अंगणवाडी सेवीकांची महत्वाची कार्य आहे. म्हणून ग्रामीण विकासात अंगणवाडी सेवीकाची भूमीका फार महत्वाची आहे.

**एकात्मिक बाल विकासाचे उद्देश :–**

१) ६ वर्षाखालील बालकांचा आहार व आरोग्य विषयक दर्जा सुधारणे.
२) बालकांचा मानसिक,शाररिक व सामाजिक विकास करणे.
३) कुपोषणाचे, अपंगत्वाचे, बालमृत्यूचे व शाळा सोडून जाण्याचे प्रमाण कमी करणे.
४) मातांना आहार व आरोग्य विषयक शिक्षण देणे.
५) बालकांना व मातांनापूरक व पोषक आहार दणे.
६) गरोदर माताचे व बालकांचे लसीकरण करणे.
७) बालकांची व माताची आरोग्या तपासणी करणे.

**अंगणवाडी सेविकांची भूमिका :–**

१) मुलांचा शाररिक विकास करणे.
२) मुलांचा सामाजिक विकास घडवून आणणे.
३) मुलांच्या भाषेचा विकास करणे.
४) मुलांच्या बौध्यिक विकास घडवून आणणे.
५) मुलांमध्ये स्वालंबनाची सवय निर्माण करणे.

६) मुलांमध्ये नवनिर्मितीची क्षमता वाढविणे.
७) मुलाला चांगल्या आरोग्य विषयक सवयी लावणे.

**अंगणवाडी सेविकांची कार्य :—**

१) ग्रामीण व शहरी भागातील अंगणवाडी चालवीणे.
२) ग्रामीण व शहरी भागातील कुटुंबाचे सर्वेक्षण करणे.
३) ० ते ६ या वयोगटातील बालकांची नोंदणी करणे.
४) अंगणवाडीतील मुलांना वेळेवर आहार देणे.
५) पूर्व प्राथमिक शिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करणे.
६) लसीकरणाचे सत्र आयोजित करणे.
७) गर्भवती मातांची त्यांच्या घरी जाऊन भेट घेणे.

**संशोधन अभ्यास विषयाची गरज :—**

देशातील पुढील पिढी घडविण्यासाठी अंगणवाडी ही मोलाचे योगदान देत आहे. म्हणून अंगणवाडीतील सेविका बालकावर आरोग्य व शिक्षणाच्या माध्येमातून काही खर्च करीत असतो परंतु हा बालकावर केलेला खर्च नसून ती भविष्यातील गुंतवणूक असते. भारतातील ग्रामीण व शहरी भागात बालकांच्या शाररिक व मानसिक विकासाचा पाया मजबूत करण्याचं काम आज भारतात अंगणवाडया करीत आहे . तसेच विकासाचा पाया मजबूत करण्याचे काम देशात अंगणवाडया करीत आहे . देशातील ग्रामीण व शहरी भागातील अंगणवाडया हया ० ते ६ वर्ष वयोगटातील बालकांना व गरोदर मातांना पूरक व पोषक आहार, अनौपचारिक प्रारंभिक शिक्षण, आरोग्य, लसीकरण, आरोग्य तपासणी, पोषणमूल्य व संबधीत सेवाची जबाबदारी इत्यादी कार्य करीत आहे . तसेच अंगणवाडी सेविका ही देशाच्या भवितव्याची पूर्वतयारी करण्याचे काम अगदी कमी मोबदल्यावर करीत आहे . अंगणवाडी सेविका ही त्या गावातील असल्यामुळे सरकारसाठी विविध माहिती मिडविण्याची जबाबदारी अंगणवाडी सेविकांवर नेहमीच टाकण्यात येते व ती जबाबदारी शुध्द पूर्ण करीत असते. परंतु या कामासाठी त्यांना कोणताही अतिरिक्त मोबदला देण्यात येत नाही . म्हणून अंगणवाडी सेविका हया देशाच्या राष्ट्उभारणीत व देशाच्या ग्रामीण विकासात महत्वाची भूमिका बजावीत आहे. हिच या विषयातील संशोधन अभ्यासाची गरज होय

.**संशोधनाचे महत्व :—**

अंगणवाडीत अंगणवाडी सेविकांच्या मार्गदर्शनाखाली शिक्षण घेणारी ० ते ६ वर्षवयोगटातील मुले ही उदयाचे भावी नागरिक असल्यामुळे त्या बालकांना योग्य शिक्षण देणे ही काळाची, देशाची व अंगणवाडी सेवीकाची जबाबदारी असते. म्हणून सरकारने व अंगणवाडी सेवीकाने बालकांना योग्य मार्गदर्शन करून प्रेरित केले तर ते भारताचे संपन्न नागरिक बनू शकतात . तसेच एकात्मिक बालविकास योजनेअंतर्गत अंगणवाडी सेविका हया अंगणवाडीतील ० ते ६ वर्षाखालील बालकांना पुरविल्या जाणाऱ्या ज्या शासनाच्या सेवा आहे त्या त्यांना पूर्णपणे मिळते का ? व एकात्मिक बालविकास योजनेअंतर्गत अंगणवाडी सेविका यांना ज्या सोयी व सुविधा मीळतात त्यामुळे अंगणवाडी सेविका समाधानी आहे का ? यांचा अभ्यास करणे हे या सेशोधनाचे महत्व आहे.

**संशोधनाची आवश्यकता :—**

१) अंगणवाडी सेविका ही अंगणवाडी शिक्षणामुळे मुलांना चांगली शिस्त लावते.
२) अंगणवाडी सेविका ही अंगणवाडी शिक्षणामुळे मुलांमध्ये विकासात्मक बदल घडवून आणते.
३) अंगणवाडी सेविका ही अंगणवाडी शिक्षणामुळे बालकाचे सामाजिक व मानसिक स्वास्थ घडविते.
४) अंगणवाडी सेविका ही अंगणवाडीतील बालकांना दिली जाणारी सुविधा योग्य मुदतीत देतात.
५) अंगणवाडी सेविका ही अंगणवाडीत बालकांना दिल्या जाणाऱ्या सुविधामुळे समाधानी आहे.

**संशोधनाचे उदिष्ठे :—**

१) अंगणवाडी सेविकाच्या उत्पन्न, खर्च व बचतीच्या भूमिकेचा अभ्यास करणे.
२) अंगणवाडी सेविका हि लसीकरणाबाबद किती जागृत आहे यांचा अभ्यास करणे.
३) महिला व बालक यांच्या सुदृढ आरोग्यासाठी अंगणवाडी सेविकाच्या भूमिकेचा अभ्यास करणे.
४) अंगणवाडी सेविकांच्या वैयक्तिक व कौटूबिक पार्श्वभूमीचा अभ्यास करणे.
५) एकात्मिक बालविकास योजनेअंतर्गत अंगणवाडी सेवाविषयी अंगणवाडी सेविकांच्या मतांचा अभ्यास करणे.
६) गरोदर महिलांना दिल्या जाणऱ्या पोषक आहाराविषयी अंगणवाडी सेविकांच्या मताचा अभ्यास करणे.
७) बालकांना दिल्या जाणाऱ्या आरोग्य शिक्षणाविषयी अंगणवाडी सेविकांच्या मताचे अध्ययन करणे.
८) अंगणवाडी सेविकांच्या आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक व सर्वागीण घटकांचा अभ्यास करणे.

**संशोधनाची पध्दती :—**

''ग्रामीण विकासात एकात्मिक विकास योजनेअंतर्गत अंगणवाडी सेविकाची भूमिका'' या विषयाच्या अनुसंघाने माहिती संकलीत करीत असताना संशोधनाच्या खालील पध्दतीचा अवलंब केला जाईल.

१) क्षेत्रकार्य अध्ययन पध्दती.
२) ऐतिहासिक पध्दती.
३) तुलनात्मक पध्दती.

४) सहभागी निरीक्षण पध्दती.
५) संख्यात्मक आणि गुणात्मक पध्दती.

**तथ्य संकलन :—**

**अ) प्राथमिक स्तोत्र :—**

प्रस्तुत संशोधनात तथ्य संकलन करण्यायाठी खालील माध्यमाचा वापर करण्यात येईल.

१) मुलाखत :—
२) प्रश्नावली :—
३) निरीक्षण :—
४) ग्रंथालयाचा वापर :—

**ब) दुय्यम स्तोत्र :—**

प्रस्तुत संशोधनात तथ्य संकलन करण्यासाठी खालील माध्यमाचा वापर करण्यात येईल.

१) संदर्भ ग्रंथ :—
२) अहवाल :—
३) दस्ताएवज :—
४) शोध पत्रिका :—
५) नियतकालिके :—
६) वर्तमानपत्रे :—
७) इंटरनेट :—
८) मासिके :—

**संशोधनाची गृहीतकृत्ये :—**

"ग्रामीण विकासात एकात्किक विकास योजनेअंतर्गत अंगणवाडी सेवीकाची भूमिका " ह्या विषयाचे अध्ययन करण्यासाठी खालील गृहीतकृत्ये निश्चित करण्यात आले आहे.

१) अंगनवाडी सेविकांची आर्थिक स्थिती ही कमकुवत आहे.
२) अंगणवाडी सेविकाचे बचतीचे प्रमाण फार कमी आहे.
३) अंगणवाडी सेविका यांना शाशनाद्वारे कमी प्रमाणात आर्थिक मदत पुरविण्यात येते.
४) अंगणवाडी सेविकांचा आर्थिक व सामाजिक घटकाशी जवळचा संबंध आहे.
५) अंगणवाडी सेविकांना आर्थिक, सामाजिक व राजकीय घटक पंभावीत करतात.
६) बहुतांश अंगणवाडी सेविकांना एकात्मिक बालविकास योजनेची अपूर्ण माहिती आहे.
७) अंगणवाडी सेविकांना अंगणवाडीत दिल्या जाणाऱ्या सेवाची अपूर्ण माहिती आहे.

**शिफारशी :—**

१) अंगणवाडी सेविकांना आरोग्य विषयक शिक्षणाची पूर्णपणे माहिती देणे.
२) अंगणवाडी सेविकांना एकात्मिक बालविकास कार्यक्रमाची माहिती देणे.
३) अंगणवाडी सेविकांना अनऔपचारिक पूर्वप्राथमिक शिक्षणाची माहिती देणे.
४) अंगणवाडी सेविकांना बालकाच्या व गरोदर मातेच्या आहाराविषयी माहिती समजून देणे.
५) अंगणवाडी सेविकांना आरोग्य तपासणी विषयी माहिती देणे.
६) अंगणवाडी सेविकांना कुपोषण, बालमृत्यू, अपंगत्व कमी करण्यासाठी प्रशिक्षण देणे.
७) अंगणवाडी सेविकांना निरोगी समाज कसा निर्माण करता येईल याविषयी माहिती देणे.
८) अंगणवाडी सेविकांना माहिला व बालकांचा सर्वांगीण विकास करण्याकरीता माहिती देणे.

**निष्कर्ष :—**

भारतीय भाषामध्ये अंगणवाडी शब्दाचा अर्थ " अंगणवाडी निवास" असा केला आहे. भारत सरकारणे १९७७ मध्ये एकात्मिक बाल विकास योजनेअंतर्गत अंगणवाडी चालू केल्या आहेत . एकात्मिक बालविकास योजनेअंतर्गत अंगणवाड्या स्थापन करण्याचा मुख्य उद्देश हा बालकामधील कुपोषनाशी लढा देणे हा होय . आज महाराष्ट्रात १०८००५ अंगणवाड्या व मिनी अंगणवाडी केंद्र आहेत .व महाराष्ट्रात ५५० पेक्षा जास्त एकात्मिक बाल विकास प्रकल्प चालू आहेत ज्यामध्ये ४००० च्या वर पर्यवेक्षक आणि २ लक्ष अंगणवाडी कर्मचारी / अंगणवाडी सेविका / मदतनिस कर्मचारी कार्यरत आहेत .टंगणवाडी हे सर्व आरोग्य, पोषण आणि शिक्षण विषयक योजनाचे एक मध्यवर्ती केंद्र आहे. देशातील येणारी पुढील पिढी घडविण्यात अंगणवाडी मोलाचे योगदान देत आहे. तसेच अंगणवाडी ही बालकांचा शाररिक व मानसिक विकासाचा पाया मजबूत करण्याचे काम करीत आहेत . म्हणून अंगणवाडीने बालकाच्या आरोग्य व शिक्षणासाठी ही केलेली गुंतवणूकच आहे असे म्हटले जाते.

अंगणवाडी सेविका ही सरकारी कर्मचारी नसते, अंगणवाडी सेविकांना फार कमी मोबदला मीळत असते. अंगणवाडी सेविकांना कोणत्याही सरकारी सोयी व सुविधा मीळत नाही. तरी अंगणवाडी सेविका सरकारची विविध माहिती मिळवण्यासाठी नेहमी कार्यरत असतात. म्हणून अंगणवाडी सेविकांचे देशाच्या आष्ट्रउभारणीत व ग्रामीण विकासात महत्वाचे योगदान आहे

**संदर्भ :**

रा.ना.घाटोळे, समाज शास्त्रीय संशोधन तत्वे व पध्दती. श्री मंगेश प्रकाशन,– २००८ – नागपूर

प्रदीप आगलावे, नमुना निवडीचे तंत्र, सामाजिक संशोधन पध्दती. श्री. साईनाथ प्रकाशन,– २००७ – नागपूर

प्रेमला काळे , बाल मानसशास्त्र. श्री. विद्या प्रकाशन,– २००० – पुणे

कुसुम जूननकर , मातृत्व आणि बालसंगोपण. पिंपळापुरे प्रकाशन,– २०००– नागपूर

महाराष्ट्र राज्य . एकात्मिक बालविकास योजना .मार्गदर्शिका,– २००२ – ०३

हेमंत कार्णिक, राष्ट्रउभारणीसाठी अंगणवाडी.

डॉ. श्याम आष्टेकर. आरोग्यविद्या.

खोबे, महिला व बालकल्याण विभाग जि . चंद्रपूर .मार्गदर्शिका व पूर्व शालेय शिक्षण अभ्यासक्रम पुस्तिका.

अंगणवाडी सेविका प्रशिक्षण पुस्तिका. सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

निर्मला पुरंदरे, बालवाडीताई प्रशिक्षण